Pratibha International Interdisciplinary Journal – Vol. 01, Issue 01, April-June 2025. ISSN-XXX-XXX

# बुद्धाचे धम्मतत्त्वज्ञान मानवी कल्याणाची संहिता

**डॉ. विश्वजीत कांबळे**

सहयोगी प्राध्यापक, शिवरामजी मोघे महाविद्यालय, केळापूर (पांढरकवडा) जि. यवतमाळ.

(Corresponding author: vishwajitkamble999@gmail.com)

*****************************************************************************************

## प्रस्तावना :-

आजचे युग जागतिकीकरणाचे युग आहे. अवघे जग जागतिकीकरणाच्या संक्रमणातून वाटचाल करीत आहे. या युगाला विज्ञानाचे युग म्हणून संबोधले आहे. विज्ञानाचे युग म्हणत असलो तरीही अंधश्रद्धा, बुवाबाजी, रूढी, प्रथा-परंपरा यासारख्या बाबी सुरूच आहेत. जात, धर्म, पंथांच्या नावावर आजही देशात विविध प्रकारचे अन्याय अत्याचार सुरूच आहेत. देशात अनेक प्रकारचे प्रश्न उभे होत आहेत. दहशतवाद, आतंकवाद सारख्या समस्यांनी मानवी जीवनात भितीचे वातावरण निर्माण होत आहे. महिलांवर होत असलेल्या अन्यायावरून महिलांच्या सुरक्षेचा आणि संरक्षणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. एकूणच काय तर देशात सर्वत्र अस्थिरतेचे वातावरण निर्माण होत चालेले असल्याचे बोलल्या जात आहे. या पार्श्वभूमिवर मानवी जीवनाचे सर्वांगाने कल्याण साधण्यासाठी बुद्धांच्या समतामूलक धम्मतत्त्वज्ञानाच्या अध्ययन अध्यापनाची आज नितांत आवश्यकता आहे.

संपूर्ण मानवी जीवनाला दु:खमुक्त करून मानवी जीवनात आनंदाची बाग फुलविण्यासाठी बुद्धाने तीन हजार वर्षांपूर्वी धम्माचे तत्त्वज्ञान सांगितले आहे. धम्म मानवी जीवनाच्या उत्कर्षाची दिशा आहे. धम्माने जीर्ण मूल्ये मोडीत काढली आणि नव्या मानवी जीवनमूल्यांचे बीजारोपण केले. धम्म ही एक आदर्श जीवन जगण्याची समतामूलक संहिता आहे.

**बुद्धाचे पहिले प्रवचन :-**

बुद्धत्वप्राप्तीनंतर तथागत बुद्धाने सारनाथ येथे पहिले प्रवचन दिले त्यावेळी त्यांनी नवजीवनमार्ग प्रतिपादन केला. आपला जो मार्ग आहे, जो धम्म आहे त्याला ईश्वर आणि आत्मा यांच्याशी काहीही कर्तव्य नाही. त्याचा मरणोत्तर जीवनाशी कसलाही संबंध नाही. तसेच धर्माच्या कर्मकांडाशी काहीही संबंध नाही. माणूस आणि माणसाचे माणसाशी या जगातील नाते हा बुद्धाच्या धम्माचा केंद्रवर्ती विषय आहे. माणूस दु:खात खितपत पडला आहे. संपूर्ण जग दु:खाने ग्रासले आहे. जगातून हे दु:ख नाहीसे करणे ही धम्माची मूळ संकल्पना आहे.

दीघनिकाय मधील 'महावग्गा'त सांगितल्याप्रमाणे तथागत बुद्धाला सम्यक संबोधिच्यावेळीच प्रतित्यसमुत्पादाच्या सिद्धांताचा प्रत्यय आला होता. विज्ञान आणि आत्मवाद व अनात्मवाद याविषयी आनंदास उपदेश करताना बुद्धाने 'प्रतित्यसमुत्पाद' सिद्धांत सांगितला आहे. प्रतित्यसमुत्पाद मध्यम मार्गाने तत्त्वज्ञान सांगतो. हाच बुद्धाचा 'मध्यम मार्ग' होय. सिंहनाद वग्गातील 'चुलसिंहनाद सुत्ता'त बुद्धाने कार्यकारणभाव म्हणजेच प्रतित्यसमुत्पाद सांगितला आहे. बुद्ध म्हणतात, 'प्रतित्यसमुत्पाद म्हणजे अविद्येपासून संस्कार उत्पन्न होतात. संस्कारापासून सळायतन उत्पन्न होते. सळायतनापासून स्पर्श उत्पन्न होते. स्पर्शापासून वेदना उत्पन्न होते. वेदनेपासून तृष्णा उत्पन्न होते. तृष्णेपासून उपादान (लोभ) उत्पन्न होते. उपादानापासून भव (कर्म) उत्पन्न होते. भवापासून जाती (जन्म) उत्पन्न होते. आणि जन्मामुळे म्हातारपण, मरण, शोक याप्रमाणे सगळ्या दु:खाचा समुदाय निर्माण होतो. बुद्धाचा हा कार्यकारणभाव म्हणजेच प्रतित्यसमुत्पाद होय.

प्रतित्यसमुत्पादाचा सिद्धांत माणसात नैतिकता, शील, आचरण, कुशल कर्म या गुणांचा विकास घडवून आणते. 'कुसलस्स उपसंपदा' म्हणजेच चांगल्या गुणांना आणि सदाचाराला आचरणात आणण्याचा संदेश बुद्धाने दिला आहे. इतक्या सोप्या शब्दात अखिल मानवजातीच्या कल्याणाचा सिद्धांत जगात बुद्धाशिवाय दुसऱ्या कोणीही सांगितलेला नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथातील द्वितीय खंडातील तिसऱ्या भागात प्रतित्यसमुत्पाद सिद्धांताविषयी सांगितले आहे. 'सर्व विश्व 'प्रतित्यसमुत्पाद' म्हणजे कार्यकारण भावाच्या सिद्धांतावर आधारलेले आहे. आणि जी कारणे क्रियाशील असतात ती अमानसिक नसतात. उदाहरणार्थ, पेला ज्या सुवर्णाचा केलेला असतो ते अंतर्बाह्य सुवर्णच असते. म्हणून आपण ईश्वरपुजेच्या आणि त्याच्या प्रार्थनेच्या थोतांडाचा त्याग करूया. ज्यांच्यापासून काहीही फायदा नाही. अशा गुढ गोष्टीविषयी निष्फळ कल्पना करीत बसून आपण स्वत:चेच नुकसान करून घेऊ नये. आत्मा आणि स्वार्थीपणा यांचा आपण त्याग करूया. आणि कुशल कर्म करूया म्हणजे त्याचे फळही आपणास चांगले मिळेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला प्रतित्यसमुत्पादाचा हा अर्थ व्यापक असा आहे. यावरून अनित्यता, दु:ख, अनात्मता आणि निब्बाण या सर्व बाबीं प्रतित्यसमुत्पादाच्या सिद्धांतावर म्हणजेच कार्यकारणभावाच्या सिद्धांतावर आधारित आहेत. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पटवून दिले आहे. बुद्धाचे धम्मतत्त्वज्ञान हे मानवी जीवनाच्या कल्याणाची समतामूलक संहिता असल्यामुळेच भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या धम्माचा स्वीकार केला.

**आर्यसत्ये :-**

तथागत बुद्धाने 1) दु:ख आर्यसत्य 2) दु:ख समुदाय आर्यसत्य 3) दु:ख निरोध आर्यसत्य आणि 4) दु:ख निरोधगामिनी प्रतिपदा आर्यसत्य. ही चार आर्यसत्ये सांगितली आहेत. या दु:खाचे निवारण कसे करावे यासाठी प्रतित्यसमुत्पादमध्ये मध्यम मार्ग सांगितला आहे.

**अष्टांगिक मार्ग :-**

तथागत बुद्धाने अष्टांगिक मार्ग म्हणजेच सदाचाराचा मार्ग प्रतिपादन केला आहे. सम्यक मार्गाचे अनुसरण म्हणजे बौद्ध जीवन मार्गाचे अनुसरण होय. असे बुद्धाने सांगितले आहे. मानवी जीवनात सर्व मार्गामध्ये श्रेष्ठ मार्ग म्हणजे अष्टांगिक मार्ग आहे. बौद्ध

साहित्यात संयुक्तनिकायमधील महावग्गातील 'मग्ग संयुक्त' मध्ये तथागत बुद्धाने अष्टांगिक मार्ग सांगितला आहे. 1) सम्यक दृष्टी 2) सम्यक संकल्प 3) सम्यक वाचा 4) सम्यक कर्म 5) सम्यक आजीविका 6) सम्यक व्यायाम 7) सम्यक स्मृती आणि 8) सम्यक समाधी. या तत्त्वानुसार आचरण केल्यास संपूर्ण मानवी जीवन निश्चितच सुखी आणि संपन्न होईल हे तथागत बुद्धाने स्वत: सिद्ध करून दाखविले आहे. बुद्धाने आत्म्यावर आधारलेला धर्म हा कल्पनाश्रित धर्म आहे, असे म्हटले. आत्म्यावर विश्वास ठेवणे निरूपयोगी आहे. बुद्धाचा आत्म्यावर विश्वास नव्हता म्हणून त्यांच्या सिद्धांताला 'अनात्मवाद' म्हणतात.

**कर्म सिद्धांत :-**

मानवी जीवनात धम्माच्या मूलतत्त्व कम्मसिद्धांताला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. 'कम्म' (कर्म) म्हणजे मनुष्याकडून केले जाते ते कार्य आणि विपाक म्हणजे त्याचा परिणाम. जर नैतिक व्यवस्था वाईट असेल तर त्याचे कारण मनुष्य अकुशल कर्म करतो. आणि नैतिक व्यवस्था चांगली असेल तर त्याचा अर्थ मनुष्य कुशल कर्म करीत आहे असा होतो. म्हणून बुद्ध म्हणतात, 'नैतिक व्यवस्था ही ईश्वर सांभाळीत नसून ती कर्म नियमाप्रमांणे सांभाळली जाते.' यामुळेच 'कर्म' हे जगातील नैतिक व्यवस्थेचा आधार आहे हे मानणे म्हणजे 'धम्म' होय असे बाबासाहेब म्हणतात.

**नीती :-**

धम्मात नीतीला अत्यंत महत्त्व आहे. धम्मात प्रार्थना, तिर्थयात्रा, कर्मकांड, विधी अथवा यज्ञ अशा गोष्टींना स्थान नाही. धर्मामध्ये नीतीला स्थान नाही. परंतु धम्मामध्ये नीतीला महत्त्वाचे स्थान आहे. जगातील नैतिक व्यवस्था ही माणसांवर सोपविलेली आहे. इतर कोणावरही नाही. असे बुद्धाने सांगितले आहे. कम्मनियमाप्रमाणे आपली नैतिक व्यवस्था सांभाळली जाते. असे बुद्धाने सांगितले आहे. सुंदर मन जन्मास घालणारा धम्म बुद्धाने संपूर्ण जगाला दिला आहे. माणसाने आपले कर्तव्य करताना वाईट विचारांना दूर सारावे, विकारांचे ओझे बाजुला सारून संपूर्ण जगाने मानवतेचे, मानवी कल्याणाचे विचार अंगिकारावे.

संपूर्ण जग सुंदर व्हावे आणि यातूनच स्वत:चे निब्बाण साधावे अर्थात कल्याण साधावे, असे बुद्‌ध सांगतात.

**धम्माचे प्रयोजन :-**

धम्म हे माणसाच्या सामाजिक आणि सांस्कृतीक उत्कर्षाचे सदाचारी जीवन होय. हे जीवन म्हणजेच विषमतेचे दहन, कर्मकांडांना मुठमाती, दैवी चमत्कारांना आणि अदभूत शक्तींना कायमचा छेद होय. धम्म परिवर्तनशील आहे. धम्म हे मानवी जीवनाचे 'विज्ञान' आहे. माणसाच्या संपूर्ण स्वातंष्याचा 'जाहीरनामा'च आहे. बुद्‌धाला सामाजिक परिवर्तन अपेक्षित आहे. 'बुद्‌ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जगाची पुनर्रचना करणे' आणि 'जग हे धम्मराज्य बणविने' हे धम्माचे मुख्य प्रयोजन असल्याचे सांगितले आहे. याअर्थी जगाला पारंपारिक गुलामगिरीतून मूक्त व्हायचे असेल तर बौद्‌ध धम्माशिवाय दुसरा पर्यायच नाही.

बुद्‌धाने सांगितलेच आहे की, 'मी मोक्षदाता नाही, मार्गदाता आहे.' याचा अर्थच असा की मानवाच्या कल्याणासाठी, विकासासाठी बुद्‌धाने नवा मार्ग दाखविला आहे. यातून बुद्‌धाने मानवाच्या आदर्श जीवनासाठी एक आदर्श संहिताच निर्माण केली आहे. त्यानुसार आचरण केल्यास माणसाला जीवनात कधीही दु:खाची जाणीव होणार नाही.

संयुक्तनिकायातील 'सळायतन सुत्तात' बुद्‌ध म्हणतात, 'धम्म आदी कल्याणकारी, मध्य कल्याणकारी आणि शेवटी कल्याणकारी आहे.' हा धम्म बहुजनांच्या हितासाठी आणि सुखासाठी आहे. म्हणून आपण माणसांच्या हितासाठी आणि सुखासाठी विचरण करा. असा उपदेश बुद्‌धाने भिक्खूंना केला आहे. जगातल्या शेेवटच्या माणसापर्यंत धम्म पोहचविण्यासाठी धम्मदेसना करण्यास जाण्यासाठी बुद्‌धाने भिक्खूंना सांगितले होते. संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठीच बुद्‌धाने धम्माचा जागतिक प्रचार-प्रसार केला आहे.

अत्तदीप भव

तथागत बुद्ध म्हणतात, 'जे काही उत्पन्न होते, ते सर्व नष्ट होणारच असते. म्हणून भिक्खूंनो! अत्तदीप, अत्तशरण होऊन विचरण करा. धम्म्दीप, धम्मशरण होऊन विचरण करा. धम्म्दीप, संघशरण होऊन रहा.' 'अत्तदीप सुत्ता'त बुद्धाने स्वयंप्रकाशित होण्याचा उपदेश केला आहे. माणसाने स्वयंप्रकाशित, स्वयंदीप अर्थातच स्वावलंबी आणि स्वाभिमानी होण्यासाठी बुद्धाने मानवतावादी संदेश दिला आहे. मानवी कल्याणाचा इतका स्वच्छंद उद्घोष बुद्धाशिवाय कोणीही केलेला नाही. त्रिसरण, पंचशील, पारमिता ही आचरण सूत्रे माणसाला संस्कारित बनविते. समाजात माणसाचे स्थान उंचावते. अर्थातच माणसाला आदर्श पुरूष बनविते.

बहुजन हिताय, बहुजन सुखाय

बुद्धाने मानवाला स्वतंष्य विचार करण्याचे स्वातंष्य दिले आहे. मी सांगतो म्हणून माझा धम्म स्वीकारा असे बुद्धाने म्हटले नाही. उलट तुमच्या विचाराला पटेल तर स्वीकारा असे सांगून माणसाला वैचारिक स्वातंष्य बहाल केले आहे. जगातील दु:खाचे निवारण व्हावे हाच धम्माचा सार आहे. बौद्ध धम्म 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' आहे. बुद्धाने मानवाला सभोवतालच्या घटनांची चिकित्सा करण्यासाठी बुद्धीचा वापर करण्यास सांगितले आहे. प्रत्येक माणसाने परस्परांशी मैत्रीभावनेने वागण्यास सांगितले आहे. यातूनच मानवतावादी समाजाची निर्मिती होऊ शकते. असे प्रतिपादन केले आहे. न्यायावर आधारित मैत्रीभाव मानवी समाजाच्या विकासासाठी मानवतेचा उद्घोष करते. 'थेरगाथा' आणि 'थेरीगाथा' या ग्रथांमध्ये मध्ये अनेक भिक्खू आणि भिक्खुणींच्या तोंडून निघालेल्या उधानातून बुद्धाच्या मानवतावादी सिद्धांताचा गौरव व्यक्त झाला आहे.

'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथामध्ये प्रा. ड्वाइट गोडार्ड यांचे मत नोंदविताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात, मानवतेची योग्यता उंचावण्याच्या कर्तृत्वात जर खऱ्या थोर माणसाचे मोठेपण सामावलेले असेल तर खरा थोर असा तथागताशिवाय दुसरा कोण असू

शकेल? त्यांनी मानवाच्या वर दुसरे कोणी संस्थापित करून त्याला हीन न करता प्रज्ञा व मैत्रीच्या शिखरावर त्याला प्रस्थापित करून उच्चत्त्व प्राप्त करून दिले आहे.

**महामंगलसुत्त :-**

'सुत्तनिपात' या ग्रंथात बुद्धाने 'महामंगलसुत्त' सांगितले आहे. श्रावस्ती येथील जेतवनात अनाथपिण्डकाच्या आरामात बुद्धाने 'महामंगलसुत्ता'चा उपदेश केला आहे. महामंगलसुत्त हे मानवी जीवनाचे कल्याण साधणारे सुत्त आहे. यात बुद्धाने मनुष्यास सुख मिळण्यासाठी कोणते उत्तम मंगल आहेत ते सांगितले आहे. बारा गाथांचे हे सुत्त मानवी जीवणासाठी उत्तम मंगल सांगते.

माणसाला स्वावलंबी, स्वाभिमानी स्वच्छंद स्वातंष्याचे जीवन जगण्यासाठी तथागत बुद्धाने उत्तम मंगल सांगितले आहे. मानवी जीवनातील हितसंबंध, नातेसंबंध महत्त्वाचे असतात. त्यामुळे त्याची आदरपूर्वक जपणूक करावी यासंदर्भाने देखील उत्तम मंगल मार्गदर्शकच आहे. मानवाचा मानवाशी असलेला संबंध मैत्रीभावना वृद्धींगत करते. सुविचारी माणूस जग तेजस्वी करतो. महामंगलसुत्त मानवमुक्तीचा, मानवतेचा आणि माणुसकीचा जागतिक संदेश देते.

**जागतिक विचारवंतावर बुद्धांचा प्रभाव :-**

बुद्धाच्या धम्माने संपूर्ण जगाला समतेचा संदेश दिला आहे. समांतर शिकवण देण्याचे काम केले आहे. समता प्रस्थापित करणारा धम्म म्हणून या धम्माला संपूर्ण जगाणे स्वीकारले आहे. बुद्धाच्या धम्माने जगातल्या अनेक विचारवंतांना प्रभावित केले आहे. आधुनिक पद्धतीने नव्या दिशेने विचार करण्यास प्रेरित केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वत: बुद्धाच्या धम्माने प्रभावित झाले आहेत. त्यांनी प्रा. एस. एस. राघवाचार, आर. जे. जॅकसन, विमवुड रीड, डॉ. रंजन रॉय, जे. जे. थॉम्पसन, मॅक्सवेल, इ. जी. टेलर, रेव्हरण्ड लेस्ली बोल्टन, प्रा. ड्वाइट गोडार्ड, ई.जे मिल्स, प्रा. डब्ल्यू. टी. स्टेस. यांनी मांडलेल्या बुद्धाविषयीच्या मतांचा प्रामुख्याने उल्लेख केला आहे. बुद्ध आणि त्यांचा धम्म किती श्रेष्ठ

आणि अपूर्व आहे हे लक्षात येण्यास एवढेसे पुरेसे आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात.

**बुद्धाच्या धम्मातील मूल्य सौंदर्य :-**

तथागत बुद्धाच्या शिकवणुकीतील समता, स्वातंष्य, बंधुता, न्याय, प्रज्ञा, शील, करुणा, मैत्री अशी मानवी जीवनमूल्ये सामाजिकदृष्ट्य अत्यंत महत्त्वाची आहेत. या जीवनमूल्यांनी संपूर्ण मानवजातीला सन्मान मिळवून दिला आहे. ही जीवनमूल्ये तथागत बुद्धाने माणसांच्या मनात रूजविली आहे. म्हणूनच ही मूल्ये आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठीचे 'दीपस्तंभ' ठरली आहेत. या जगात द्वेषाने द्वेष कधीच शमत नाही, तर पे्रमाणेच त्याचा उपशम होतो. म्हणेन सर्वांवर प्रेम करा. प्रेमातूनच सर्वांविषयी 'करुणा' तुमच्या हृदयात जागृत होऊन तुमच्या हातून हिंसेची कृती घडणार नाही. ही तथागत बुद्धाच्या कल्याणकारी मूल्यांमधून मिळणारी आदर्श शिकवण आहे. बुद्धाची ही शिकवण माणसांचा गौरव करणारी आहे. सामाजिक परिवर्तन घडवून आनणारी ही मूल्ये मानवी जीवन संस्कारित करते. माणसांच्या मनात सम्यक विचार फुलविते. माणसाचा 'माणूस' म्हणून सन्मान करते-सन्मान वाढविते.

**बुद्धधम्मात स्त्रियांचे स्थान :-**

तथागत बुद्धाने आपल्या धम्मामध्ये स्त्रियांना स्थान देवून स्त्रियांना स्त्री-पुरूष समानतेचा सन्मान दिला. स्त्रियांचा इतका मान-सन्मान करणारा, वाढविणारा आणि त्यांना स्वातंष्य बहाल करणारा विचार त्याकाळी बुद्धाशिवाय कोणीही सांगितलेला नाही. स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावणारे त्यांना स्वातंष्य देणारे बुद्ध हे जगातील पहिले महामानव होत. स्त्री स्वातंष्याची ही जगातील पहिली क्रांती आहे.

वैदिक परंपरेत स्त्रियांना अत्यंत कनिष्ठ दर्जाचे स्थान होते. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत शूद्रांना शिक्षणाचा अधिकार नाकारला होता. तसाच स्त्रियांनाही नाकारला होता. स्त्रीया केवळ उपभोगाचे साधन हा या परंपरेतील स्त्रियांचा दर्जा राहिला असल्याचे दिसते. स्त्रियांचा मान

सन्मान या वैदिक परंपरेने कधी केलाच नाही असेच म्हणावे लागेल. त्यांच्याच परंपरेतील वाङ्मयात याची अनेक उदाहरणे बघावयास मिळतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'क्रांती आणि प्रतिक्रांती' या ग्रंथात याचे बरेच संदर्भ नोंदविले आहेत.

त्रिपिटकातील सुत्तपिटकाच्या खुद्दकनिकायात स्त्रियांच्या स्वातंष्याचा उद्घोष करणारा 'थेरीगाथा' हा महान ग्रंथ आहे. स्त्रिमुक्तीचा आद्यहुंकार म्हणून 'थेरीगाथा' हा बौद्ध साहित्यातील अत्यंत महत्त्वाचा ग्रंथ आहे. दु:खमुक्त जीवनाचे जीवनानुभव यातून अभिव्यक्त झाले आहेत. 'माणूस' म्हणून नाकारलेले मूल्य सर्वप्रथम बुद्धाने स्त्रियांना बहाल केले आहे.

बुद्धाच्या धम्मात कोणताच भेद नाही. 'समता' हेच मूल्य बुद्धाच्या धम्मात आहे. म्हणूनच स्त्रियांना सुद्धा भिक्खू संघात मानाचे स्थान आहे. बौद्ध धम्मात स्त्रियांना पुरूषापेक्षा उच्च दर्जा दिला आहे. कारण स्त्री पुरूषासाठी प्रसववेदना सहन करते. मुलांचे लालन पालन करून त्याला सज्ञान बनविते. स्त्रियांचा मान सन्मान करणारा, वाढवणारा बौद्ध धम्मासारखा दुसरा कोणताच धर्म नाही.

बुद्धाच्या धम्मात स्त्रियांचा दर्जा पुरूषाएवढाच आहे. संयुक्त निकायातील भिक्खूणी संयुक्तामधिल 'सोमा सुत्त' मध्ये सोमा भिक्खूणीच्या मारासोबत झालेल्या संवादातून हे स्पष्ट होते. याच भिक्खूणी संयुक्तात आळविका सुत्त, किसा गौतमी सुत्त, विजया सुत्त, उप्पलवण्णा सुत्त, चाला सुत्त, उपचाला सुत्त, सीसुपचाला सुत्त, सेला सुत्त, वजिरा सुत्त इत्यादी सुत्तांमध्ये मारावर विजय मिळविणाऱ्या आणि स्त्री-पुरूष समानतेचे तत्त्व विशद करणाऱ्या अनेक भिक्खुणी आहेत.

मज्झिम निकायातील चुलयमक वग्गातील 'चुल वेदल्ल' सुत्तात धम्मदिना भिक्खुणीने उपासक विशाख यास रूप उपानाद स्कंध, वेदना उपानाद स्कंध, संज्ञा उपानाद स्कंध, संस्कार उपानाद स्कंध, आणि विज्ञान उपानाद स्कंध या पाच उपानाद स्कंधांवर प्रवचन दिले. धम्मामध्ये स्त्री आणि पुरूष दोघेही अर्हत्व प्राप्त करू शकतात. वासेट्ठी भिक्खुणी सांगते की, तथागताच्या वचनांप्रमाणे प्रयत्न करीत मी मंगलमयपदाचा आणि दिव्य ज्ञानाचा अनुभव

घेतला. याचप्रमाणे चाला भिक्खुणी म्हणते, अर्हत पदचा व दिव्यसुखाचा अनुभव घेतला. अशाप्रकारे स्त्रियांनी सुद्धा अर्हत पद प्राप्त करून जीवनात सुखाचा अनुभव घेतल्याचा जागतिक इतिहास बुद्ध धम्मात आहे.

संयुक्त निकायातील कोसल संयुक्त मधिल 'मल्लिका सुत्त' मध्ये सांगितले आहे, एकदा श्रावस्तीतील जेतवनात कोसल राजा प्रसेनजित संभाषण करीत असता, राजप्रासादातून आलेल्या सेवकाने मल्लिका राणीला कन्यारत्न झाल्याचे राजाला सांगितले. या वृत्ताने राजा खिन्न झाला. तथागतांनी राजाला त्याच्या खिन्नतेचे कारण विचारले. मल्लिका राणीला कन्यारत्न झाल्याच्या वृत्ताने आपण खिन्न असल्याचे राजाने सांगितले.

यावर बुद्ध म्हणाले, 'राजा, काही काही स्त्रियां सुद्धा पुरूषापेक्षा वरचढ, बुद्धीवान, शीलवान असतात. ती शहाणी आणि सद्गुणी कन्या, पत्नी, माता अशा त्रिविध भ्ूमिका करणारी आहे. तिला जो पुत्र होईल, तो पराक्रमी कृत्ये करील, मोठे राज्य करील. खरोखर अशा थोर स्त्रीचा पुत्र राज्याचे अनुशासन करेल, देशाचा मार्गदाता होईल.' अशाप्रकारे बुद्धाने स्त्रियांचा गौरव केला आहे.

तथागत बुद्धांनी स्त्रियांना अत्यंत आदराने सन्मानीत केले आहे. बुद्धाने स्त्रियांचा नेहमीच गौरव केला आहे. अंगुत्तर निकायातील चवथ्या निपात मधिल महावग्गांमधील 'मल्लिका सुत्त' वरून हे स्पष्ट होते. प्रसेनजित राजाची राणी मल्लिकादेवीला स्त्री स्वभावाविषयी उपदेश केला. आचरणाने स्त्रिया सौंदर्यशाली होतात, हे बुद्धाच्या उपदेशाने मल्लिका राणीला समजले. ती बुद्धाची उपासिका झाली. आणि आयुष्यभर धम्माची सेवा केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकारंनी विषमतावादी मनुविचारांना तिलांजली दिली. आणि समता युगाचे शिल्पकार होऊन बुद्धाच्या मानवतावादी विचारांनी जागतिक क्रांती घडवून आणली. बुद्धाच्या समताप्रणित विज्ञाननिष्ठ अशा सैद्धांतिक धम्मविचारांची ही जागतिक सिद्धताच

होय. मी तर असे म्हणेल की, तथागत बुद्ध, महात्मा जोतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महामानवांमुळेच आज संपूर्ण स्त्री-जीवन शिक्षित, सुरक्षित आणि स्वतंत्र आहे.

महाप्रजापती गौतमी, खेमा, उप्पलवण्णा, पटाचारा, धम्मदिना, नंदा, सोना, सकुला, भद्दा कुडलकेसा, भद्दा कपिलानी, भद्दा कच्चना (यशोधरा), किसा गौतमी, सिगाल माता. या भिक्खूणींमध्ये सर्वश्रेष्ठ होत्या. उपासिकांमध्ये सुजाता, विशाखा, खुज्जत्तरा, सामावती, उत्तरा नंदमाता, सुप्पवासा कोलियदुहिता, सुप्पिया उपासिका, कातियानी नकुलमाता इत्यादी उपासिका सर्वश्रेष्ठ होत्या. बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारात या स्त्रियांचे मोलाचे योगदान राहिले आहे.

आधुनिक स्त्री-मुक्ती आंदोलनाचा उदय जवळपास तीन हजार वर्षांपूर्वी तथागत बुद्धाने केला. आज स्त्री-मुक्ती आंदोलनाला जे काही यश मिळाले असेल, त्या यशाच्या पाठीमागे आधिपासूनच कुठेना कुठे बुद्धाच्या धम्माचे आणि बौद्ध संस्कृतीचे एक अविभाज्य अंग राहिले आहे.

**पारमिता :-**

बौद्ध साहित्यात 1) दान 2) शील 3) नैष्कर्म 4) प्रज्ञा 5) वीर्य 6) शांती 7) सत्य 8) अधिष्ठान 9) मैत्री आणि 10) उपदेश या दहा पारमिता सांगितल्या आहेत. या पारमिता माणसाला संस्कारित बनविते. समाजात माणसाचे स्थान उंचावते. अर्थातच माणसाला आदर्श 'माणूस' बनविते.

**धम्म: आदर्श जीवनाची आचरण संहिता**

बौद्ध साहित्यामध्ये 'धम्मदप' हा जागतिक पातळीवरील प्रसिद्ध ग्रंथ आहे. धम्मपदात म्हटले आहे-

न तावता धम्मधरो यावता बहु भासति।
यो च अप्पम्पि सुत्वान धम्मं कायेन पस्सति
स वे धम्मधरो होति यो धम्मं नपम्मज्जति॥

अर्थात एखादा पुष्कळ बोलतो म्हणून तो धर्मधर होत नाही. जो थोडेच बोलतो, ते आपल्या आचरणात आणतो व धर्माची अवहेलना करीत नाही त्यालाच धर्मधर म्हणावे.

यस्स पापं कतं कम्मं कुसलेन पिथीयति।

सो'मं लोकं पभासेति अब्भा मुत्तो' व चन्दिमा॥

अर्थात, ज्याचे कर्म चांगले आहेत, ते चांगले कर्म वाईट कर्माला झाकून टाकतात. जसा ढगातून बाहेर पडलेला चंद्रमा सर्व जगाला प्रकाशमान करतो. त्याप्रमाणे चांगले कर्म सुद्धा आपले जीवन प्रकाशमान करते.

धम्मं चरे सुचरितं न तं दुच्चरितं चरे।

धम्मचारी सुखं सेति अस्मि लोके परम्हिचं॥

अर्थात, धम्माप्रमाणे आचरण करावे. दुराचरण करू नये. धम्माप्रमाणे आचरण करणारा मनुष्य आपले जीवन यशस्वीपणे जगू शकतो. याचा अर्थच असा की, आपले कर्म कुशल असावे. अकुशल कर्म हे मानवी जीवनासाठी अधोगतीचे आहे. कुशल कर्म करून जीवन यशस्वी करावे असे बुद्धाचे सांगणे आहे. मानवी जीवनाच्या संपूर्ण कल्याणासाठी बुद्धाने धम्माचे प्रतिपादन केले आहे.

**समारोप :-**

समारोप करताना सांगावेसे वाटते की, तथागत बुद्धाने संपूर्ण सजीव सृष्टीचा विचार केला आहे. बुद्धाने माणसाला श्रेष्ठ माणले आहे. माणसाशिवाय कोणीही श्रेष्ठ नाही. असा मानवतावादी विचार बुद्धाने सांगितला आहे. बुद्धाचा धम्म संपूर्ण मानवी जीवनाच्या उत्थानासाठी एक 'दीपस्तंभ' आहे. 'बुद्धं सरणं गच्छामी'चं सुंदर 'विहार' आहे. मानवी जीवनाला अंधारातून उजेडात घेवून जाणारा मानव मुक्तीचा, मानवी कल्याणाचा 'धम्मपथ' आहे. अर्थातच बुद्धाचे धम्मतत्त्वज्ञान मानवी कल्याणाची समतामूलक संहिता आहे.

**निष्कर्ष :-**

1. सामाजिक समता निर्माण करून संपूर्ण मानवजातीचे कल्याण साधणे हे बुद्धाच्या धम्मतत्त्वज्ञानाचे प्रयोजन असल्याचे दिसून येते.
2. संपूर्ण मानवजातीच्या स्वातंष्याचा विचार बुद्धाच्या धम्माम असल्यामुळे मानवी कल्याणासाठी बुद्धाच्या विचारांच्या अध्ययन आणि अध्यसपनाची आज नितांत आवश्यकता आहे असे लक्षात येते.
3. बुद्धाच्या तत्त्वचिंतनातील मूलतत्त्वे मानवी जीवन उन्नत करणारे आणि नैतिकतेने उजाळून टाकणारे आहेत.
4. तथागत बुद्धाच्या विचारांनी प्रभावित होऊन जागतिक किर्तीचे विचारवंत आणि वैज्ञानिक निर्माण झाले आहेत असे दिसून येते.
5. तथागत बुद्धाने आपल्या धम्मामध्ये स्त्रियांना स्थान देऊन स्त्री स्वातंष्याचा आणि स्त्री-पुरूष समानतेचा उद्घोष केला.
6. मानवजातीच्या संपूर्ण स्वातंष्याचा विचार बुद्धाच्या धम्माम असल्यामुळे मानवी कल्याणासाठी बुद्धाच्या विचारांची आज नितांत आवश्यकता आहे असे लक्षात येते.

**Declaration of conflict of interests:**

Authors wish to confirm that there are no known conflicts of interest associated with this publication. We confirm that the manuscript has been read and approved by me and there are no other persons who satisfied the criteria for authorship but are not listed.

We confirm that we have given due consideration to the protection of intellectual property associated with this work and that there are no impediments to publication, including the timing of publication, with respect to intellectual property.

**Plagiarism statement (Mandatory):**

Authors declare that this research paper is my original work, and we have properly cited all sources used in this study. We have not submitted this work or any part of it for publication or academic credit elsewhere. I understand that plagiarism is a serious academic offense and take full responsibility for the content of this paper.

**संदर्भ :-**

1. आंबेडकर डॉ. बाबासाहेब, भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म, (अनुवाद- घन:शाम तळवटकर, प्राचार्य म. भि. चिटणीस, शां. शं. रेगे), प्रकाशक, पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई, अठरावी आवृत्ती, 2005.
2. धर्मकिर्ती महाथेरो भदन्त, भगवान बुद्ध का इतिहास एवं धम्मदर्शन, प्रकाशक, भारतीय बुद्ध धम्म ज्ञान विद्यालय संस्था, नागपूर, प्रथमावृत्ती, 14 एप्रैल, 1986.
3. कोसंबी आचार्य धर्मानंद, बुद्ध धम्मावरील चार निबंध-1, बुद्ध, धर्म आणि संघ, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, 1जानेवारी, 2003.
4. कोसंबी प्रा. धर्मानंद, सुत्तनिपात, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, 6 ऑक्टोबर, 2011.
5. सांकृत्यायन महापंडित राहुल, बुद्धचर्य्या, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, पंचम संस्करण, 2011.
6. तिस्सवंस भदन्त, सुत्तपिटक, सुगत प्रकाशन, नागपूर, 2006.
7. तिस्सवंस भदन्त, विनयपिटक, सुगत प्रकाशन, नागपूर, 2006.
8. मोरे मा. शं., भ. बुद्धांचा मध्यम मार्ग, कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, 25 डिसेंबर, 2009.
9. सांकृत्यायन महापंडित राहुल, विनय पिटक, सम्यक प्रकाशन, नई दिल्ली, प्रथम संस्करण, 2008.
10. उपाध्याय भरतसिंह, पाली साहित्य का इतिहास, प्रकाशक, हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग, इलाहाबाद, छटा संस्करण, 2000.
11. आंबेडकर डॉ. बाबासाहेब, क्रांती आणि प्रतिक्रांती, सुगत प्रकाशन, नागपूर, प्रथम आवृत्ती, 12 डिसेंबर, 2008.
12. भगत आचार्य सूर्यकान्त व भस्मे डॉ. राजेंद्र (अनु,संपा.) : धम्मपद गाथा आणि त्यांच्या अट्ठकथा, सुधीर प्रकाशन वर्धा, प्रथम आवृत्ती, 6 मे, 2012.